# नियमित दिवाणी मुकदमा क्र. ९०/२०१५ मधील निशाणी ५५ खालील आदेश

०१. अर्ज व त्यावरील वादीने दिलेले म्हणणे (नि.६०) वाचले. प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री.ए.एस.देवुसकर व वादीतर्फे विधिज्ञ श्री.ए.एस.डिंगणकर यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १,२,४,७,८,१० व ११ यांनी वादी व प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांचे विरूध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो दावा मिळकतीबाबत तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्याकरीता दिलेला आहे.

०२. प्रतिवादीचे अर्जातील कथन की, दावा मिळकतीकडे वादीचा कोणताही संबंध नसुन दावा मिळकती वादीच्या ताब्यातील नाही. दावा मिळकती या मुळ श्रीदेव रामचंद्र लक्ष्मण सिता या देवस्थानच्या मालकीची मिळकत असून ती प्रतिवादींचे पूर्वज यांच्याकडे इनाम म्हणून कब्जा भोग्य वहिवाटीत दिलेली आहे. त्याबाबतची १८०७—१८०८ सालातील सनद सदाशिव रामचंद्र भट नाख्ये यांच्याकडे त्यांच्या नोकरीचा खर्च यासाठी व त्यानंतर त्यांचा मुलगा बापू सदाशिव भट नाख्ये यांच्याकडे असून पुढे त्यांच्याच कुटुंबाकडे आजमितीपर्यत आहे. त्याबाबतची नोंद सावंतवाडी संस्थानच्या नोंदवहीत आहे. दावा मिळकती या संस्थानच्या इनाम मिळकती नाहीत याबाबत वादीने कोणताही पुरावा सादर केलेला नाही. प्रतिवादींचे पुढे कथन की, दावा ‘अ’ मिळकत म्हणजेच भु.क्र.१३० हि.क्र.४ ही मिळकत प्रतिवादींच्या कब्जात फार पूर्वीपासून असून त्यावर वादी व प्रतिवादी क्र.१२ ते १४ चा कोणताही हक्क संबंध नाही. त्या मिळकतीत असलेले आंब्याचे झाड याची फळे प्रतिवादी काढत होते. ते जुनाट झाल्यामुळे प्रतिवादींनी ते झाड तोडलेले आहे. त्यातील असलेल्या काजूच्या झाडाचे काजू व बांबुच्या बेटाचे बांबु प्रतिवादी तोडतात. तेथील असलेल्या फणसाच्या झाडाचे फणस प्रतिवादी घेतात. त्या मिळकतीत अनेक जुनाट व कवळकाड जंगली झाडे आहेत व ती मिळकत प्रतिवादींच्या कब्जात आहे. दावा ‘ब’ मिळकतीतील अ.क्र. २ व ३ च्या मिळकतीची विक्री वादीला झालेली आहे. परंतु, तशी विक्री देवस्थानच्या मिळकतीची होत नसल्यामुळे ती विक्री बेकायदेशीर आहे. दावा ‘क’ मिळकतीतील अ.क्र. १४ ते १५ च्या मिळकती देवस्थानच्या मिळकती असल्यामुळे विक्री तहकुब झालेली आहे. दावा मिळकतीवर वादीचा कोणताही हक्क संबंध नाही. वादी हे दावा मिळकतीतील प्रतिवादींच्या कब्जाला हरकत अडथळा करीत असून त्यांनी १२/०२/२०१७ रोजी प्रतिवादींना अटकाव केला व अंगावर धावून जावून मारण्याच्या धमक्या दिल्या. दावा मिळकतीवर प्रतिवादींच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. वादी दावा मिळकतीत घुसून उत्पन्नाची नासधुस करण्याच्या व तेथील झाडे तोडण्याच्या विचारात आहेत. त्यामुळे वादी व प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांनी दावा मिळकतीवरील प्रतिवादींच्या ताब्याला

हरकत अडथळा करु नये, तेथील झाडे तोडू नये, त्या मिळकतीचे नुकसान करु नये म्हणून त्यांच्याविरुध्द तुर्तातुर्त ताकिद आदेश मिळण्याची मागणी केली आहे.

०३. वादीने सदर अर्जावर त्यांचे म्हणणे (नि.६०) देवून अर्जाला सक्त हरकत घेतलेली आहे. वादीचे म्हणणे की प्रतिवादींनी दिलेला अर्ज खोटा आहे. दावा मिळकती वादी व प्रतिवादी क्र.१२ ते १४ यांच्या पाच पिढयांपासून कुळ या नात्याने कब्जाभोग्यात चालत आलेल्या आहेत. प्रतिवादी हे श्रीराम देवस्थानचे पुजारी नाहीत. ते तेथील कोणतीही व्यवस्था पाहत नाहीत. दावा मिळकतीच्या सातबारा उता—यात कुळ म्हणून पूर्वीपासून आजपर्यत वादीच्या नावाची नोंद आहे व ते तेथे भात शेती करुन त्यातून उत्पन्न घेतात. दावा मिळकतीमध्ये असलेल्या आंबा व काजूची झाडे यांच्यावरील उत्पन्न कुळ म्हणून वादीच घेतात. महसुल अधिकार अभिलेख अस्तित्वात आला त्यावेळी दि.२३/०५/१९५९ रोजी लक्ष्मण अर्जुन साळगावकर यांच्या नावाची नोंद कुळ म्हणून दावा मिळकतीला फेरफार नोंद क्र.२१९७ ने नोंद झालेली आहे. दावा अ.क्र.८ च्या मिळकतीत माडाची बागायत असून अ.क्र. ११ च्या मिळकतीत वादीचे घर आहे. उर्वरीत मिळकतीत त्यांची भात शेती आहे. प्रतिवादींनी वादीविरुध्द सदरचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे तो नांमजुर करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे.

०४. प्रतिवादींचा अर्ज (नि.५५) व त्यावर वादीने दिलेले म्हणणे (नि.६०) यांचा विचार करता सदर अर्जाचे निर्णयासाठी खालील वादप्रश्न माझे विचाराधीन आलेले आहेत. त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह त्यापुढे दिलेप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १ | दाव्यात संयुक्तिक बाजू कोणाला आहे ? | .. | ''अंशत: प्रतिवादींस'' |
| २ | न्यायाचा तराजू कोणाचे वतीने दिसून येतो ? | .. | ''अंशत: प्रतिवादींच्या बाजूने'' |
| ३ | तुर्तातुर्त ताकिद न दिल्यास कोणाचे अतोनात नुकसान होणार आहे ? | .. | ''अंशत: प्रतिवादींचे'' |
| ४ | कोणता आदेश ? | .. | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**—: का र ण मि मां सा :—**

०५. प्रस्तुतच्या अर्जाचे पुष्टयर्थ प्रतिवादी क्र.२ यांनी स्वत:चे शपथपत्र दिले असून वृक्षाधिकारी यांच्याकडील नोटीस व आदेश, सावंतवाडी पोलिस ठाण्यात दिलेली अदखलपात्र गुन्हयाची फिर्याद, फेरफार उतारा असे कागदपत्र दाखल केले आहेत. वादी यांनी दावा मिळकतीचे सातबारा उतारे, फेरफार उतारे लगत कब्जेदार याचे शपथपत्र असे कागदपत्र दाखल केले आहेत. त्यांचा उल्लेख यापुढे चर्चा करतांना वेळोवेळी केलेला आहे.

**वादप्रश्न क्र. ०१ करीता :—**

०६. प्रस्तुतच्या वादप्रश्नाच्या अनुषंगाने दाव्यात कोणाला संयुक्तीक बाजू आहे यासाठी दावा मिळकती कोणाच्या ताब्यात आहे हे पाहणे आवश्यक आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार दावा मिळकती या त्यांच्या ताबेकब्जातील मिळकती असून दावा मिळकती या देवस्थान इनाम जमिन आहे व ती त्यांना इनाम म्हणून देण्यात आलेली असून ती देवस्थानची मिळकत असल्यामुळे वादीचा त्या मिळकतीवर कोणताही हक्क व अधिकार नाही व ती त्यांच्या ताब्यातील मिळकत नाही. वादीने त्यांच्या म्हणण्यामध्ये दावा मिळकती या वादीच्या ताब्यातील असून ती पाच पिढयांपासून कुळ म्हणून त्यांच्या ताब्यात आहे दावा मिळकतीत वादी हे भात शेती करतात. तेथे त्यांचे घर आहे. तसेच त्यांची झाडे आहे. त्यांचे उत्पन्नही ते घेतात. दावा मिळकत प्रतिवादींना इनाम म्हणून कधीही दिलेली नाही असे नमुद केलेले आहे.

०७. दावा मिळकती कोणाच्या ताब्यात आहे याकरीता वादी व प्रतिवादी दोघांनीही एकमेंकाविरुध्द कथन केलेले असल्यामुळे दावा मिळकतींच्या ताब्याबाबतची परिस्थिती महसूल दप्तरातील कागदपत्रावरुन पाहणे आवश्यक आहे. प्रतिवादींनी दावा मिळकतीचे सातबाराचे उतारे दाखल केलेले नाहीत. वादीने दावा मिळकतीचे सातबाराचे उतारे दाखल केलेले असून त्यानुसार मौजे कुंभारवाडा येथील भुमापन क्र.१३० हि.क्र.४ (नि.६) या मिळकतीचे भोगवटादार सदरी प्रतिवादी क्र.१ ते ११ यांच्या नावाची नोंद आहे. भूमापन क्र. १२७ हि.क्र. ३ (नि.७) चे भोगवटदार म्हणून वादी, प्रतिवादी क्र.१२ ते १४ यांच्या नावाची नोंद आहे. भूमापन क्र.१२९ हि.क्र.१६ (नि.८) ला वादी, प्रतिवादी क्र.१२ ते १४ यांची भोगवटदार म्हणून नोंद असून इतर अधिकारात माधव नाख्ये यांची नोंद आहे. भूमापन क्र.१२७ हि.क्र.६ (नि.९), भुमापन क्र.१२७ हि.क्र.१२ (नि.१०), भुमापन क्र.१२९ हि.क्र.११ (नि.११), भुमापन क्र.१२९ हि.क्र.३०—३२ (नि.१२), भुमापन क्र.१२९ हि.क्र.३१ (नि.१३), भुमापन क्र. १३१ हि.क्र.५ (नि.१४), भुमापन क्र.१३० हि.क्र.६ (नि.१५), भुमापन क्र.१३१ हि.क्र.१५ (नि.

१५), भुमापन क्र.१३० हि.क्र.१३ (नि.१७), भुमापन क्र.१३० हि.क्र.१५ (नि.१८), भुमापन क्र. १३० हि.क्र.१७ (नि.१९), भुमापन क्र.१३० हि.क्र.२० (नि.२०) चे भोगवटदार म्हणून माधव नाख्ये, श्रीपाद नाख्ये, गणपत नाख्ये, बाळ नाख्ये व कुळ म्हणून वादी व प्रतिवादी क्र.१२ ते १४ यांच्या नावाची नोंद असून जमिन देवस्थान विक्रीस स्थगित अशी नोंद आहे. सातबाराचा उतारा यामधील नोंदी या मिळकतीवर ताबा कोणाचा आहे यासाठी महत्वाच्या नोंदी असतात. सदरील सातबाराचा उतारा या महसुल दप्तरी कागदपत्रावरुन भुमापन क्र.१३० हि.क्र.४ ही केवळ प्रतिवादींच्या ताबे कब्जातील मिळकत असल्याचे दिसून येत असून इतर मिळकती या भोगवटदार सदरी जरी प्रतिवादी यांचे पूर्वाधिकारी यांच्या नावे असल्या तरी कुळ म्हणून त्या मिळकतींना वादी व प्रतिवादी क्र. १२ ते १४ च्या नावाची नोंद आहे. मुंबई शेतजमिन व कुळवहिवाट अधिनियम या नुसार ज्याच्या ताब्यामध्ये मिळकत आहे व ती मिळकत कसतो तो जमिनीचा कुळ असतो. सातबाराच्या उता—यामध्ये वादी व प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांच्या नावाची कुळ म्हणून नोंद असल्यामुळे जरी सातबा—याच्या उता—यात जमिन देवस्थान विक्रीस स्थगित अशी नोंद असली तरी वादी व प्रतिवादी क्र.१२ ते १४ यांच्या नावाची नोंद कुळ म्हणून असल्यामुळे ती वादी व प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांच्या ताब्यातील मिळकत असल्याचे सातबा—याच्या उता—यावरुन दिसून येते.

०८. वादीने फेरफार नोंद क्र.६३५१ (नि.२१) चा उतारा दाखल केला असून त्यानुसार दशरथ साळगांवकर कुळ सरस्वती देवस्थळी जमिन मालक ही जमिन देवस्थान असल्यामुळे विक्रीस स्थगित अशी नोंद असून त्यानुसार तीन जमिनींची त्यात नोंद आहे. फेरफार नोंद क्र.३१३९ नुसार देवस्थान जमिन असल्यामुळे त्यास कुळकायदा ३२ग लागू नसल्यामुळे चौदा जमिनींना देवस्थान इनाम अशी नोंद केलेली आहे. फेरफार नोंद क्र.२१९७ (नि.२३) नुसार लक्ष्मण साळगांवकर कुळ असल्यामुळे त्यांची कुळ म्हणून मिळकतींना नोंद केलेली आहे. फेरफार नोंद क्र.२६१४ (नि.२४) नुसार श्रीपाद नाख्ये, गणपत नाख्ये व महादेव नाख्ये यांनी दिलेल्या अर्जानुसार दिनांक २६/०५/१९६३ रोजी एकुण ९९ मिळकतींना देवस्थान इनाम म्हणून त्यांच्या नावाची नोंद झालेली आहे. फेरफार नोंद क्र.७८४३ नुसार प्रतिवादी यांच्या नावाची नोंद सरस्वती देवस्थळी यांच्या ऐवजी ५६ मिळकतींना झाल्याची नोंद आहे. सदरील फेरफार उता—यातील नोंदीनुसार त्यामध्ये नमुद असलेल्या मिळकती या देवस्थानच्या मिळकती असल्याची नोंद आहे. तसेच त्यातील काही मिळकती या कुळ म्हणून लक्ष्मण साळगांवकर यांच्या असल्याचे त्यात नमुद असल्याचे दिसते. वादी अथवा प्रतिवादी कोणीही फेरफार उता—यामध्ये असलेल्या जमिनीचे क्रमांक व दावा जमिनीचे क्रमांक हे वेगवेगळे असल्यामुळे दावा जमिनी याच पूर्वीच्या त्या जमिनी होत्या या अनुषंगाने त्यांच्या

बदललेल्या क्रमांकाचे फेरफार अथवा महसुल दप्तरातील नोंदी त्यांनी दाखल केलेल्या नसल्यामुळे फेरफार उता—यातील मिळकती याच दावा मिळकती आहेत हे पुराव्याअभावी दिसून येत नाही. त्यामुळे दावा मिळकतीची सद्यपरिस्थीती ही केवळ सातबा—याच्या उतार—यावरुन पाहणे आवश्यक दिसते.

०९. वरील दावा मिळकतीचे सातबाराचे उता—यानुसार दावा अ.क्र. १ ची मिळकत म्हणजेच भु.क्र. १३० हि.क्र.४ हिच मिळकत प्रतिवादींच्या ताबे कब्जातील मिळकत असल्याचे दिसते व इतर मिळकती सकृत दर्शनी वादी व प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांच्या ताब्यातील असल्याचे दिसते. वादीची दावा मिळकतीला झालेली नोंद ही योग्य आहे की अयोग्य आहे व त्याबाबतचा त्यांनी मागीतलेला ठराव ते मिळण्यास पात्र आहेत की नाही, तसेच दावा मिळकतीचे इतर अधिकारात त्यांची झालेली नोंद योग्य आहे की नाही हे दाव्यात पुराव्याअंती ठरणार आहे. त्याबाबत या टप्प्यात भाष्य करण्याची कोणतीही आवश्यक नाही. त्यामुळे त्याबाबत विवेचन केलेले नाही. वादीने दावा 'अ' मिळकत त्यांचे ताब्यात आहे याबाबत सकृतदर्शनी पुरावा दिलेला नाही. तसेच दावा 'अ' मिळकत व्यतिरिक्त इतर मिळकती वादीच्या ताब्यातील नाहीत व त्या त्यांचे ताब्यातील आहेत याबाबत प्रतिवादीनी कोणताही सकृतदर्शनी पुरावा दिलेला नाही. सबब वरील बाबींवरुन सकृतदर्शनी दावा अ.क्र.१ ची मिळकत प्रतिवादींच्या ताब्यात असल्यामुळे मी वाद प्रश्न क्र. १ करीता अंशतः ''होकारार्थी'' निष्कर्ष नोंदवित आहे.

<u>वादप्रश्न क्र. २ व ३ करीता</u>

१०. दावा अ.क्र. १ ची मिळकत प्रतिवादी क्र. १ च्या ताब्यात असल्यामुळे व इतर मिळकती या वादी व प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांच्या ताब्यात असल्यामुळे संयुक्तीक बाजू दाव्यात अंशतः वादीच्या व अंशतः प्रतिवादींच्या बाजूने असल्याचे दिसून येते. दावा अ.क्र.१ ची मिळकत प्रतिवादींच्या ताब्यात असल्यामुळे व प्रतिवादीने (नि.६८) कडे दाखल केलेली वृक्षाधिकारी यांच्याकडील नोटीस, आदेश व अदखलपात्र गुन्हयाची नोंद यावरुन वादी यांनी अनधिकृतरित्या त्या मिळकतीतील झाडांची तोड केल्यामुळे त्यांना दंड झालेला आहे. यावरुन सकृत दर्शनी वादी हे दावा अ.क्र. १ च्या मिळकतीतील झाडांची तोड करुन नुकसान करीत आहे असे दिसते. वादी यांनी दावा अ.क्र.१ च्या मिळकतीतील झाडांची तोड केल्यास प्रतिवादींचा दावा मिळकतीवरील कब्जा नाहीसा होवून त्यांच्या मिळकतीचे नुकसान होणार आहे व तसे झाल्यास प्रतिवादींचे अतोनात नुकसान होणार आहे. याउलट दावा अ.क्र. १ची मिळकत वादीच्या ताब्यात नसल्यामुळे वादीविरुध्द तुर्तातुर्त ताकिद आदेश दिल्यास त्यांचे

कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच दावा अ.क्र १ ची मिळकत वगळता इतर मिळकती सकृत दर्शनी वादीच्या ताब्यात असल्यामुळे त्या मिळकतीकरीता वादी व प्रतिवादी क्र. १२ ते १४ यांना ताकिद आदेश दिल्यास त्यांना मिळकतीचा उपभोग घेता येणार नाही. याउलट सकृत दर्शनी त्या मिळकती प्रतिवादींच्या ताब्यात नसल्यामूळे वादीविरुध्द तुर्तातुर्त ताकिद आदेश न दिल्यास प्रतिवादींचे काही नुकसान होईल असे दिसून येत नाही. त्यामुळे दाव्यात न्यायाचा समतोल अंशत: प्रतिवादींच्या बाजूने व तुर्तातुर्त ताकिद आदेश न दिल्यास अंशत: प्रतिवादींचे नुकसान होणार असल्यामुळे मी दावा अ.क्र.१ चे मिळकतीकरीता प्रतिवादींच्या बाजूने वादप्रश्न क्र.२ ते ३ करीता ''अंशत: होकारार्थी'' निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न क्र.४ करीता</u>**

११. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादींनी वादीविरुध्द दाखल केलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ मधील 'अ' ची तरतुद पाहता त्यानुसार कोणत्याही दाव्यात शपथपत्रावरुन किंवा अन्यथा एखादया दाव्यातील कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेचा दाव्यातील कोणत्याही पक्षकाराकडून अपव्यय केला जाण्याचा, तिचे नुकसान केले जाण्याचा किंवा ती अन्यक्रमीत केली जाण्याचा अथवा हुकुमनाम्याची अंमलबजावणी करीत असतांना तिची गैरपणे विक्री केली जाण्याचा धोका असल्यास तुर्तातुर्त ताकिद आदेश देता येतो, अशी तरतुद आहे. सदर तरतुदी नुसार वरील प्रमाणे परिस्थितीत असल्यास वादी अथवा प्रतिवादी यांना एकमेकांविरुध्द तुर्तातुर्त ताकीद आदेश मागता येतो अशी तरतुद असल्याचे दिसते.

१२. तसेच प्रतिवादींनी त्यांना वादी विरुध्द तुर्तातुर्त ताकीद आदेश मागता येतो यापुष्ठर्थ **मा. उच्च न्यायालय केरळ** यांच्या कडील **<u>सत्यभामा अम्मा वि. विजय अम्मा १९९४ लॉ सुट (केरळ) १९०</u>** हा न्यायनिवाडा दाखल केलेला आहे. सदर न्यायनिवाडयामध्ये **मा.उच्च न्यायालय, केरळ** यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १(अ) नुसार नमुद असलेल्या बाबींकरीता वादी व प्रतिवादी दोघांनाही तुर्तातुर्त ताकिद आदेश मिळण्याचा अधिकार आहे. त्यासाठी प्रतिवादीसुध्दा अर्ज करु शकतो व त्यांना सुध्दा तुर्तातुर्त ताकिद आदेश मिळू शकतो असे नमुद केलेले आहे. प्रस्तुतच्या अर्जातसुध्दा प्रतिवादी हे दावा मिळकतीतील झाडाची तोड करुन तिचे नुकसान करीत आहेत म्हणजेच वादी हे प्रतिवादीच्या ताब्यातील जमिनीचे नुकसान करीत असल्यामुळे प्रतिवादींना त्याबाबत वादीविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १(अ) नुसार तुर्तातुर्त ताकिद आदेश मिळण्याचा अधिकारी असल्याचे दिसते.

१३. मी वादप्रश्न क्र.१, २ व ३ करीता अंशत: प्रतिवादींच्या बाजूने म्हणजेच दावा अ.क्र.१ च्या मिळकतीबाबत प्रतिवादींच्या बाजूने मत दिलेले असल्यामुळे व उर्वरीत मिळकतींकरीता वादीच्या बाजूने मत दिलेले असल्यामुळे अर्ज अशत: मंजुर होणास पात्र दिसतो. सबब वरील बाबींचा विचार करता मी खालील आदेश पारित करीत आहे.

**—: आ दे श :—**

(१) अर्ज अंशत: मंजुर करण्यात येत आहे.

(२) वादी व प्रतिवादी क्र.१२ ते १४ यांनी अगर त्यांचे नोकर, चाकर, प्रतिनिधी अथवा त्यांच्या वतिने कोणीही प्रतिवादी क्र. १ ते ११ यांच्या दावा अ.क्र.१ ची मिळकत म्हणजेच मौजे—कुंभारवाडा, ता.सावंतवाडी येथील भुमापन क्र.१३० हि.क्र.४ या मिळकतीवरील प्रतिवादी क्र. १ ते ११ यांच्या ताबे—कब्जाला हरकत अडथळा करु नये व त्यातील झाडांची तोड करु नये असा त्यांच्या विरुध्द या दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो तुर्तातुर्त ताकिद आदेश देण्यात येत आहे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करणेत आला.)

सही/—
(म. सु. बुधवंत)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
सावंतवाडी.

दिनांक : १९.१०.२०१८.